# ग्रामविकासात ग्रामपंचायत सदस्यांच्या भूमिकेचे अध्ययन.
## (विशेष संदर्भ : जिल्हा बुलढाणा तालुका मोताळा)

**शरद रमेश सुरळकर.**
रा.सावरगाव जहागीर, पोस्ट शेलगाव बाजार,
तालुका मोताळा,जिल्हा बुलढाणा. पिन:- ४४३१०२.
Email Address :- sharadsuralkar@gmail.com

**Abstract.**

*१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत देश स्वतंत्र झाला आणि २६ जानेवारी १९५० रोजी आपण स्वतंत्र राज्यघटनेचा स्वीकार केला. त्यानुसार भारतातील इंग्रजांची सत्ता संपुन भारत हा प्रगतीपथावर मार्गक्रमण करणारा नवदेश ठरला. स्वतंत्र राज्यघटनेच्या स्वीकारा बरोबर भारतीय राज्यघटनेने कल्याणकारी राज्याची संकल्पना अंगीकृत केली. त्यानुसार देशातील सर्व घटकांच्या प्रगती साठी आवश्यक ती कार्ये करण्याची जबाबदारी ही कल्याणकारी राज्याची बनली. भारत हा कृषिप्रधान देश असुन तो खेड्यांचा/ ग्रामांचा देश म्हणून ओळखले जाते. देशांतील 60 ते 65 % लोकसंख्या ही आजही ग्रामीण भागात राहते. मुळात ग्रामीण भारतीय संस्कृती हीच भारतीय संस्कृती म्हणून ओळखली जाते .प्राचीन काळापासून ग्राम हे भारतीय सामाजिक जीवनाचा आत्मा म्हणून ओळखले जाते. त्यामुळे राज्यकारभाराचा प्रमुख आधार म्हणून ग्रामांचे स्थान महत्त्व पूर्ण ठरते.एकंदरीत देशाचा विकास हा खेड्यांच्या विकासावर अवलंबून असल्याचे समजते. मानव विकास अवस्थेत मानव विकासाचा टप्पा मानवी टोळ्यांपासून ते स्थीर जीवन असे पर्यंतचा सर्व इतिहास हा मानव व मानवी संस्कृती चा विकास म्हणून ओळखला जातो. ऋग्वेदात ग्राम या संकल्पनेचा वापर केला असुन ग्रामीण स्तरावरच लोकांचे जीवन संघटित झाल्याचे दिसून येते. पुरातत्त्व विभागाच्या उत्खननातून इतिहास पूर्व काळातील ग्रामांचा उल्लेख आढळतो. पाषाण युगात मानव हा टोळ्यात राहत असला तरी तो नावाष्म युगात एका ठिकाणी स्थिरावल्याचे दिसते व त्यातूनच पुढे नैसर्गिकरित्या गावांची निर्मिती झाल्याचे समजते. या ग्रामांची प्रशासन व्यवस्था चालविण्यासाठी गावातील सर्व व्यक्तींकडून आपल्यातील काही वयस्क( वयाने जेष्ठ) अशा व्यक्तींची निवड करून ग्रामिण शासन व्यवस्था निर्माण केली गेली. जी ग्रामविषयक विविध बाबींवर निर्णय घेत असे. आधुनिक काळात देशात त्रिस्तरीय पंचायतराज शासन पद्धती अवलंबली असून त्यातील सर्वात महत्त्वाचा घटक म्हणून ग्रामपंचायत ओळखली जाते. आधुनिक काळात ग्रामाचा विकास करण्यासाठी विविध योजना व उपक्रम हे राज्य सरकार व केंद्र सरकार यांच्या कडून राबविण्यात येतात यामुळे गाव व शहर यांच्या संपर्कामुळे ग्रामीण समाजाच्या सामाजिक ,राजकीय, आर्थिक जीवनात आमूलाग्र बदल घडून आला आहे, परंतु सोबतच नव्याने निर्माण होणाऱ्या गरजा व समस्या देखील निर्माण झाल्या आहेत जो चिंतेचा विषय ठरत आहेत. अस्वच्छता , अनारोग्य, बेरोजगारी, व्यसनाधीनता, जातीपातीचे पालन, राजकीय गटबाजी इ मुळे ग्रामीण समाज पोखरत आहे. प्राचीन, मध्ययुगीन, ब्रिटिश, स्वातंत्रोतर कालखंडातील ग्रामीण शासन पद्धतीचा अभ्यास केला असता असे दिसून येते की ग्रामीण भाग हा स्वयंपूर्ण असून ग्रामांचे दैनंदिन कामकाज चालविण्यासाठी ग्रामतील काही लोकांची कार्यकारणी असायची या कार्यकरणीतील लोकांची निवड ही गावातीलच लोकांमधून होत असे. या कार्यकारिणीची संख्या ही साधारणतः ५ ही असायची म्हणून त्यास पंचायत असे म्हटले जात असे जी गावाशी निगडित विविध विषयांवर चर्चाविनिमय करून निर्णय घेत असत. आधुनिक काळात लोकसंख्येच्या प्रमाणात निर्माण झालेल्या प्रतिनिधित्व प्रणालीचा स्वीकार केला असल्याने ही पंच संख्या ५ पेक्षा जास्त झाली आहे. जिची निवड प्रौढ मतदाना द्व्यारे करण्यात येते ज्यात सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य यांचा समावेश होतो जे ग्रामीण विकासा संबंधित महत्वपूर्ण भूमिका बजावत असतात.*

***Keyword :*** *लोक, भारत, राज्यघटना, ग्रामपंचायत सदस्य, सदस्य निवड.*

जगातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र म्हणून भारताची ओळख आहे, भारताने लोकशाही शासन व्यवस्थेचा स्विकार केला असून त्या नुसार सत्ता संतुलन व सत्ता विकेंद्रीकरणा चे तत्व स्वीकारले आहे त्या नुसार देशातील सत्तेचे केंद्र व राज्य सरकार यांच्या मध्ये विभाजन केलेले आहे. ज्या माध्यमातून केंद्र व राज्य सरकार स्थानिक स्वराज्य संस्था वेळोवेळी अधिकार प्रदान करून लोकशाही मूल्ये व त्यांची मान्यता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत असतात. लोकशाहीचा खरा अर्थ लोकांनी लोकांकरिता लोकंसाठी जनतेच्या प्रत्यक्ष समस्या दूर करून त्यांच्या समाधानाकरिता जनतेची प्रत्यक्ष

भागीदारी असणे अभिप्रेत आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्त्व अधिका अधिक वाढत असल्याचे दिसून येते भारतासारख्या भौगोलिक व लोकसंख्यात्मक दृष्टीने विशाल असणाऱ्या देशात सत्ता विकेंद्रीकरण तत्वांच्या स्वीकारा नुसार शासन कार्या साठी स्थानिक स्वराज्य संस्था चे कार्य महत्वपूर्ण ठरते. लोकशाही शासन व्यवस्थेत पंचायत राज व्यवस्थेचे महत्वाचे स्थान असुन परिपक्व लोकशाहीच्या परिणामांकडे पोहचविण्याचे एक उत्कृष्ट माध्यम आहे ज्या द्वारे जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत इ स्तरावर स्थानिक लोक स्थानिकांच्या समस्या निवारण व लोक विकासा करिता कार्य करीत असतात ज्या तील ग्रामपंचायत हा लोकशाही मूल्याचे शिक्षण देणारी पहिली पायरी असून त्या माध्यमातून ग्रामीण लोक प्रत्यक्ष शासन कार्य पद्धतीत सहभागी होऊन आपल्या उन्नती साठी कार्ये करीत असतात. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये समाविष्टीत असलेल्या प्रत्येक गावासाठी कार्य करणाऱ्या संस्थेस ग्रामपंचायत असे म्हणतात या संस्थेत सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य. इ चा समावेश होतो ज्यांना ग्रामसभेची कार्यकारी समिती असे म्हणतात महाराष्ट्रात ग्रामपंचायतींचा कारभार हा मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५९ च्या कलम ५ अनव्ये चालविण्यात येतो.राज्यात नवीन ग्रामपंचायत स्थापित करण्याचा अधिकार हा विभागीय आयुक्त यांना असून ग्रामपंचायत निर्मिती बाबद स्थानिक लोकांची मागणी व संबंधित यंत्रणेची शिफारस असल्यास आयुक्त आपल्याला दिलेल्या अधिकारांचा वापर करीत त्या ठिकाणी नवीन ग्रामपंचायत स्थापन करण्याचे आदेश देत असतात.

भारतीय राज्य घटनेच्या मार्गदर्शक तत्वांमधील कलम ४० नुसार प्रत्येक राज्य ग्रामपंचायतीचे संघटन करण्याचे कार्य करेल. त्यानुसार देशातील राज्यांनी आपापल्या क्षेत्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासाठी आवश्यक ती पावले उचलली आहेत. महाराष्ट्र राज्यात सुद्धा याच धर्तीवर पूर्वीच्या मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५९ म्हणजेच आताच्या महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमा नुसार चालते. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम मधील महत्त्वाचे कलमे आपणास पुढील प्रमाणे सांगता येतील.

- कलम ४ गाव घोषित करणे
- कलम ५ ग्रामपंचायत स्थापन करणे
- कलम ७ ग्रामसभेची सभा
- कलम ८ पंचायती ने लेखा विवरण ग्रामसभेपुढे ठेवणे व ग्रामसभेची कर्तव्ये
- कलम ११ ग्रामपंचायत निवडणूक
- कलम २७ निवडून आलेल्या सदस्यांचा पदावधी
- कलम ३० सरपंच निवडणूक
- कलम ३० क उपसरपंच निवडणूक
- कलम ३१ सरपंच उपसरपंच यांचा पदावधी
- कलम ३८ सरपंच उपसरपंच यांची कार्ये
- कलम ४९ ग्रामविकास समित्या

वर्तमान काळात ग्रामविकासाचा विचार केला असता स्थानिक स्वराज्य संस्था व ग्रामीण विकास यांचा घनिष्ठ व परस्परावलंबी संबंध असल्याचे दिसून येते. महात्मा गांधी यांच्या मतानुसार ग्रामीण भागाचा विकास हाच देशाचा विकास होय त्यामुळे महात्मा गांधी यांच्या स्वप्नातील भारत देश घडविण्यासाठी गावांचा विकास होणे आवश्यक ठरते आणि याच स्वप्नपूर्ती करिता भारत सरकार व राज्य सरकार यांनी वेळोवेळी विविध अधिनियम व विविध योजनांच्या माध्यमातून गावांचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिसून येते. देशात मागील 70 वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून गावांना अधिक स्वायत्त करत बळकट करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे ज्या माध्यमातून स्वरूपाचे सकारात्मक बदल घडवून आणण्यात येत आहेत. जशे की ग्रामपंचायत कार्यकारणीत महिला सदस्यांचा समावेश अनुसूचित जाती व जमाती यांना प्रतिनिधीत्व इत्यादी चा समावेश होतो असे असले तरी महात्मा गांधी यांच्या स्वप्नातील खेड्यांचा विकास करण्यास व पंचायत राज चे अंतिम उद्दिष्ट प्राप्त करण्यापासून आपण खूप दूर असल्याचे दिसून येते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारात स्थानिकांनी कारभार आपल्या हाती घेऊन आपला व आपल्या समूहाचा विकास करणे अभिप्रेत आहे.अशा स्थानिक स्वराज्य संस्था ज्यांचा शेवटचा व महत्त्वपूर्ण घटक म्हणून ग्रामपंचायत कार्य करीत असते. त्या ग्रामपंचायतीची ठरलेल्या वेळी प्रौढ मतदानाद्वारे गावातीलच लोक आपल्यातील काही लोकांची ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवड करतील व ग्रामपंचायत कार्यकारणी च्या विविध पदांवर अशा लोकप्रतिनिधींची निवड करतील हे लोकप्रतिनिधी कार्यकारिणीला ठरवून दिलेले कार्य पार

पडतील ज्या माध्यमातून गावांचा व गावातील प्रत्येक घटकाचा विकास घडून येईल परंतु अनेक ठिकाणी निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींनी मार्फत संपूर्ण कार्यक्षमतेने कार्य न करता अनेक वेळा आपल्या वैयक्तिक कारणांमुळे विकासासाठी आवश्यक जाणीवपूर्वक टाळण्यात येत असल्याची अनेक उदाहरणे दिसून येतात त्यामुळे एकाच गावात ग्रामविकासाचे असंतुलन दिसून येते. यामागे गावातील जातीय समीकरण, योजनांमध्ये होणारा भेदभाव, भ्रष्टाचार, अज्ञान, मागासलेपणा, वाढती लोकसंख्या, प्रशासनिक जागृतीचा अभाव. अशी कारणे असे असले तरी आज परिस्थितीमध्ये अनेक ठिकाणी व्यापक व सकारात्मक बदल घडत आहे आज गावातील तरुण पिढी ग्रामपंचायत कारभारात लक्ष देत असून ग्रामपंचायत कारभारावर प्रत्यक्ष नियंत्रण नियंत्रण ठेवत आहे. गावातील तरुण ग्रामपंचायतीमध्ये ग्रामपंचायत सदस्य सरपंच उपसरपंच म्हणून निवडून येत आहेत व ग्रामीण विकासाचे कार्य करीत आहेत. ग्रामीण विकास हि एक गुणात्मक व निरंतन अशी चालणारी प्रक्रिया असून ग्रामीण लोकांच्या जीवनात सामाजिक, आर्थिक, राजकीय असे सकारात्मक बदल बदल घडून येणे यात अभिप्रेत आहे. ज्यात ग्रामपंचायत सदस्य व गावातील लोकांचा सहभाग महत्वाचा असून ग्रामपंचायत व ग्रामपंचायत क्षेत्रातील प्रत्येक सजीव व निर्जीव संसाधनांचा योग्य उपयोग व विनियोग होणे आवश्यक आहे. एक अर्थी ग्रामीण विकास हा निरंतन व सर्वसमावेशक असून तो ग्रामिणांच्या प्रत्येक्ष जीवनाशी संबंधित आहे. कृषी , जलसिंचन , पाणी व्यवस्थापन , गावातच रोजगाराची उपलब्धता , गावातील लघु व कुटिरोद्योग यांची स्थिती , पशुधन ,पायाभूत सुविधांचा विकास ,शिक्षण व आरोग्याची खात्री , मागासवर्गीयांची उन्नती व त्यांच्या वैयक्तिक सामाजिक जीवनात होणारी सुधारणा, महिलांची सामाजिक स्थिती व सक्षमीकरण अशा अनेक बाबींचा समावेश करता येईल. आज वाढती लोकसंख्या आणि आधुनिकतेचा प्रचार प्रसारामुळे ग्रामीण जीवन व्यवस्थेचा मुख्य स्रोत समाजातल्या जाणाऱ्या शेती व्यवसायावर ताण पडत आहे . शेतीचे तुकडीकरण , हवामानात होणारे बदल , यामुळे होणारी जमिनीची धूप , सिंचनाचा अभाव , कमी होणारी भूजल पातळी , दुष्काळ ई मुळे ग्रामीण भागात स्थिर रोजगार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शेती व्यवसाया समोर अनेक अडचणी आहेत त्यामुळे ग्रामीण भागातील सुशिक्षित तरुण हे रोजगार व सुखी, आरोग्यदायी जीवनशैली साठी शहराकडे आकर्षित होत आहेत. त्यामळे ग्रामीण विकास साधावयाचा असल्यास हि तरुण सुशिक्षित गावातच राहणे आवश्यक ठरते या करीता गावातच रोजगार, शेतीसाठी पाणी, दळणवळणाची सोय आरोग्य विषयक सुविधा , जलव्यस्थापन ई अनेक क्षेत्रात ग्रामपंचायतींनी काम करणे आवश्यक ठरते. ग्रामीण विकास आणि ग्रामपंचायतीचे आर्थिक रित्या सुब्बत असणे यांचा परस्पर व घनिष्ठ संबंध असून आर्थिकरित्या सक्षम असणाऱ्या ग्रामपंचायतींना ग्रामविकास साधण्यास व ग्रामविकासाच्या विविध योजना कार्यान्वित करण्यास मदत मिळते. तेंव्हा अशा ग्रामपंचायतीमध्ये ग्रामपंचायत सदस्य म्हणून कार्यरत सदस्यांची भूमिका हि विकस प्रक्रिया निरंतन कार्यान्वित करण्याचीअसते तर ज्या ग्रापंचायतींची आर्थिक परिस्थिती हि नाजूक स्वरूपाची आहे त्या ग्रापंचायतीत कार्यरत असणाऱ्या सदस्यांना आपली ग्रामपंचायत आर्थिक रित्या सक्षम कशी होईल यासाठी कार्यरत राहण्याची गरज असते. त्यासाठी लोकप्रतिनिधी म्हणून सदस्यांना गावातच रोजगाराची निर्मिती करणे कृषि व कृषी संबंधित बाबींवर लक्ष पुरविणे जसे कि सिंचन, जल व्यवस्थापण , पीक व्यवस्थापण गावातील संसाधनाचे योग्य व्यवस्थापण, आधुनिक कृषी संबंधी माहिती चा प्रसार, ग्रामपंचायतीचे आर्थिक उत्पन्न वाढावे म्हणून विविध व नावीन्यपूर्ण कृतींचा अंमल करणे. गावकर्यांना स्वयंशिस्ती साठी प्रेरित करणे, आर्थिक उत्पन्नाचे विविध स्रोत शोधणे, त्यांची अंमलबजावणी करणे. इ कार्यात ग्रामपंचायत सदस्यांची भूमिका आवश्यक ठरते , असे असले तरी फक्त आर्थिक रित्या सक्षम ग्रामपंचायतीचा आपल्या गावाचा विकास करू शकतात असे म्हणणे फारसे संयुक्तिक ठरणार नाही ग्रामपंचायत क्षेत्रात उपलब्ध असणारी संसाधने, गावातील कुशल मनुष्यबळ, आर्थिक व सामाजिक परिस्थिती यांचा योग्य वापर करून ग्रामविकास साधने अधिक चांगले ठरते. ग्रामीण विकास हि सर्वसामावेशक प्रक्रिया असून यात समाजातील प्रत्येक घटकाचा सहभाग व विकास होणे अभिप्रेत आहे.

आज ग्रामपंचायती मध्ये अनुसूचित जाती व जमातींचा सहभाग वाढत असून पंचायतराज व्यस्थेला अभिप्रेत असणारा बदल घडून येत असल्याचे दिसत आहे. भारतीय सामाजिक संरचने प्रमाणे आर्थिक व सामाजिक दृष्ट्या

मागास असलेल्या अनुसूचित जाती व जमातींचे लोकप्रतिनिधी हे ग्रामपंचायत सदस्य म्हणून ग्रामविकासास हातभार लावत आहेत. ते आपल्या व आपल्या समूहाच्या विकासाठी असणाऱ्या विविध योजना, उपक्रम यांचा प्रचार ,प्रसार व अंमलबजावणीत महत्वपूर्ण भूमिका पार पाडत असतात. दलित वस्ती सुधार, तांडा वस्ती विकास, पारधी आवास, रमाई आवास, देशात व परदेशात शिक्षणाची योजना, लघु व कुटीरोद्योग साठी बीजभांडवल उभे करणे, कृषी विषयक, विहीर, मोटार पंप, बैलजोडी, सौरपंप, पाईपलाईन, अशा अनेक शासकीय योजनांच्या लाभ प्राप्त करून देण्यात अनुसूचित जाती व जमातींच्या सदस्यांची भूमिका महत्वपूर्ण ठरते. अनुसूचित जाती व जमातींप्रमाणेच महिला ह्या सुद्धा ग्रामीण विकासात महत्वपूर्ण भूमिका बजावत असून, समाजाची अर्धी लोकसंख्या म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो त्यामुळे ग्रामविकासात महिलांचे स्थान मोलाचे ठरते. आज राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये ५० टक्के जागा ह्या विविध महिला प्रवर्गासाठी राखीवअसून प्रत्येक्ष ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत महिला सदस्याचा सहभाग वाढत आहे त्यामुळे महिलांसंबंधित विविध विकास कामे, योजना, उपक्रम, समस्या यांच्या सूडवणुकीत व अंमलबजावणीत महिला सदस्यांची भागीदारी उल्लेखनीय असलयाचे दिसते. ऐकूण अंदाजपत्रीत रक्कमेपैकी ३० टक्के रक्कम हि महिला संबंधित बाबींवर खर्च व्हावी असा राज्य शासनाचा नियम असल्याने महिला विकास, सक्षमीकरणात महिला ग्रामपंचायत सदस्यांची भूमिका हि निर्णायक ठरते.

**संदर्भ :-**

1. प्रा.डॉ.अर्जुनराव दर्शनकार, पंचायत राज आणि नागरी प्रशासन, कैलास पब्लिकेशन, औरंगपूरा, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती जानेवारी २०१६
2. डॉ.प्रदीप आगलावे, ग्रामीण विकास आणि नागरी समाजशास्त्र, साईनाथ प्रकाशन, नागपूर, दुसरी आवृत्ती, ऑगस्ट २०१९
3. श्री किशोर लवटे DYSP, पंचायतराज (सुधारित द्वितीय आवृत्ती),संपादक प्रकाशक, श्री महेश शिंदे, ज्ञानदीप अकॅडमी, सदाशिव पेठ, पुणे, सुधारित आवृत्ती, जुलै २०१६
4. डॉ. बिभीषण करे, लोकसहभाग आणि ग्रामीण विकास, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती, जुलै २०१६
5. भारत में ग्रामीण विकास, रामजी यादव, प्रकाशक, अर्जुन पब्लिशिंग हाऊस नई दिल्ली, संस्करण, २०१९